महाराष्ट्र टाइम्स

Saturday, May 30, 2009

**Disechant after Cancer**

Publication: Maharashtra Times, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: 1, Location: Bottom-Center, Width(cms): 15, Height(cms): 9, Size(sq.cms): 135

# कॅन्सर झाला आणि डोळे उघडले...

>> म. टा. खास प्रतिनिधी । मुंबई

लवकरच करटम्रा आणि एक्साइज आयुक्त होऊ घातलेले मुंबईचे दीपककुमार असोत, की कानपूरहून आलेला २६ वर्षांचा अस्लम... दोघांत फरक इतकाच की एकाला ४० वर्षांच्या सिगारेटच्या व्यसनातून घशाचा कॅन्सर झाला तर दुसऱ्याला गुटख्याच्या व्यसनामुळे जीभ गमवावी लागली... अशा ८ जणांनी सिगारेट-गुटखा व्यसनाची आणि त्यातून झालेल्या कॅन्सरची कहाणी शुक्रवारी टाटा हॉस्पिटलमध्ये मीडियासमोर ठेवली. यातल्या ५ जणांनी नैसर्गिक आवाज गमावलेला होता व व्हॉइस बॉक्सच्या मदतीने चाललेले त्यांचे बोलणे समोरच्याला जेमतेम कळेल न कळेल असे होते. दीपककुमार यांनी १६व्या वर्षीच सिगारेट ओढायला सुरुवात केली. ८०च्या दशकात त्यांचे व्यसन दिवसाला ४० सिगरेट इतके वाढले. त्याच सुमारास त्यांना 'स्मोकर्स कफ' झाला. त्यानंतर सिगारेट सोडण्याचा प्रयत्न करूनही व्यसन सुटले नाही. जून २००८मध्ये त्यांचा आवाज घोगरा झाला आणि ऑगस्ट २००८मध्ये 'कॅन्सर'चे निदान झाले. शस्त्रक्रियेत त्यांनी स्वरयंत्र गमावले. तिथून त्यांचे आयुष्यच बदलले. दमदार आवाज हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य घटक होता. तो तर गेलाच. शिवाय, पुन्हा कॅन्सर उपटण्याची भीती सतत असतेच... दीपककुमार सांगतात. ► झाकोळले आयुष्य । ३

## 'धोका' सूचना रविवारपासून

सिगारेट-गुटख्याचा धोका व्यसनी लोकांना सांगण्याची जबाबदारी तंबाखू उद्योगाची असली तरी आपल्याकडे मात्र त्याबाबत टाळाटाळ झाली. दिसेल न दिसेल अशा सूचनेवर भागवले गेले. अखेर आता ३१ तारखेपासून (रविवारी) सिगारेट/गुटख्याच्या पाकिटावर एका बाजूला ४० टक्के भागावर धोक्याची चित्रमय सूचना देण्याची सुरुवात होईल. आधी कबूल केल्यापेक्षा हे प्रमाण कमी असले तरी किमान सुरुवात होतेय, याचा आनंद आहे, असे 'हेलिस सेखसरिया इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थ'चे संचालक डॉ. पी. सी. गुप्ता म्हणाले.

